| महाराष्ट्र पोलीस | **प्रसिद्धिपत्रक**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**<br>**पुणे-४११००६** | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

**जा.क्र./पोउआ/वाह/2391 /२०२५ पुणे** **दिनांक - २०/०३/२०२५**

## चतु:श्रृंगी व शिवाजीनगर वाहतुक विभाग पुणे शहर अंतर्गत

गणेशखिंड रोडवरील टाटा मेट्रोच्या बांधकामा दरम्यान वाहतुक सुरळीत व सुरक्षित सुरु राहण्याकरीता व वाहतुक कोंडी होवु नये म्हणुन इकडील जा.क्र.पोउपआ/वाह/नियो/८४१४/२०२४ दि. २६/११/२०२४ अन्वये दि. २६/११/२०२४ पासुन पुणे विद्यापीठ ते शिवाजीनगर कडे जाणारी वाहतुक ही एबिल कॉर्नर - सिफनी सर्कल - नतावाडी मार्गे वळविण्यात आली होती.

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करत आहे.

**गणेशखिंड रोडवर पुणे विद्यापीठ चौकामधुन सिमला ऑफिस चौक दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांसाठी दि. २०/०३/२०२५ पासुन दुहेरी वाहतुक सुरु करण्यात येत आहे. सदर ठिकाणी यापूर्वीचे आदेश रद्द करण्यात येत आहे.**

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

**१)जिल्हा माहिति व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ४,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४)सर्व प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग, पुणे शहर.**
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित यांना तात्काळ अदा करून,त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी**

**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६)पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.